# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/11/2022 (मंगळवार) सकाळ

## चोरी

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील टेकाडी पाल नगर डंम्पींग येथे दिनांक २८/११/२०२२ चे ०१.३० वा. ते ०२.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— हरेराम लालमोहन यादव, वय ४४ वर्ष, रा. टेकाडी कॉलनी कन्हान (डब्ल्यु. सी. एल. कर्मचारी) हे पेट्रोलींग करित असताना पेट्रोलींग दरम्यान आरोपी नामे— निखील नामदेवजी हुकुम, वय २४ वर्ष, रा. गांधीचौक गोडेगाव ता. पारशिवनी हा कोळसा अंदाजे ८० किलो प्रति किलो ०८ रू. असा एकुण किंमती ६४० रूपयाचा मुद्देमाल व बिना नंबर प्लेटची मोटरसायकल किंमती अंदाजे १०,००० रूपयाचा मुद्देमाल असा एकुण १०६४० रूपयाचा मुद्देमाल चोरी करून घेवुन जातानी मिळुन आल्याने सदर आरोपी विरूदध सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक मुकेश रामेलवार बं. नं ४५७ पोलीस स्टेशन कन्हान मो. नं ९३५९८१२४६८ आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

पो.स्टे. पारशिवनी :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावर मौजा तहसिल कार्यालय, पारशिवनी येथे दिनांक २८/११/२०२२ चे ०४.०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन पारशिवनी येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, तहसिल कार्यालयाचे आवारात रेती वाहतुक करण्याचा परवाना नसतांना वाहतुक करतांना मिळुन आलेला ट्रक क्र. एम. एच. २७/ बी. एक्स ३८२३ हा महसुल विभागातील कर्मचारी यांनी दंडात्मक कार्यवाही करीता जप्त करून तहसिल कार्यालयाचे आवारात उभा करून ठेवलेला ट्रक क्र. एम. एच—२७/बी. एक्स.—३८२३ किमती अंदाजे २०,००,०००/—रू. व १० ब्रास रेती किमंती ६२,४००/— रू. असा एकुण २०,६२,४०० /—रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोराने तहसिल कार्यालयाचे आवारात अनधिकृतपणे प्रवेश करून चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— राजु नत्थुजी कुकडे, वय ५७ वर्ष, रा. काटोल नाका, जगदिश नगर, शिवमंदीर जवळ नागपुर ह. मु तहसिल कार्यालय पारशिवनी यांचे रीपोर्टवरून पोलीस स्टेशन पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरूद्ध कलम ३७९, ४४८ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बासोडे पोलीस स्टेशन पारशिवनी मो. क्र ९८२३०८३९०५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**